जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/परवानगी/४५६९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१. यांचे कार्यालय.
दिनांक :- 22 APR 1997

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे

विषय :- सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक व्हीएलएस- १०९६(५७३) प्राशि-३ दिनांक ३०-१०-९६ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९६ पासून इयत्ता १ली ते सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एक तुकडीस प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाणी | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १) | श्री सुब्रह्मण्यम मेमोरियल ट्रस्ट ३०१२ भवानी पेठ पुणे-४२ | सनजोस स्कूल केदारीनगर वानवडी द्दा२ साळुंके विहार मार्ग पुणे-४० | इ. १ ली ते ४ थी प्रत्येकी एक तुकडी फक्त | इंग्रजी |

२.१. सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायीक अर्हता आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या आधिन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतीक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व ...

... नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे, तसेच वक्तशिरपणा नियमीतपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणता ही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथ. शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यांत येईल.

२.१२. शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनी करणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहिल. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यांत येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करून घेऊन मगच संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरूध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारीआलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत इ.चे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.]

७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षा साठी रूपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत - प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे जिल्हा पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत - मा. सचिव,
गीव सुब्रमण्यम मेमोरियल ट्रस्ट ...
यांना माहितीसाठी अग्रेषित.

जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/जा.तु./पीआर./३८०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१. यांचे कार्यालय.
दिनांक : 26 MAR 1999

प्रति,

१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे विभाग.
२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ.
३] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

विषय : मान्यताप्राप्त ~~अनुदानित/विनाअनुदानित~~/कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत....

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्याचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास/जादा तुकडीस जून १९९८ पासून ~~अनुदान/विनाअनुदान~~/कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी/नैस.वाढ. | शेरा/मंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १) | जीवसुब्रम्हण्यम मेमोरिअल ट्रस्ट ची सन गेस स्कूल, ६७/२, केदारीनगर, वानवडी, पुणे-४० | इंग्रजी | ३ री ते ७ वी ची प्रत्येकी १ ली तुकडी मान्य | नैसर्गिक | मंजूर |

स्थळ प्रतीवर मा. शि. उ. सं. यांची सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत: माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
जीवसुब्रम्हण्यम मेमोरिअल ट्रस्टची सन गेस स्कूल, ६७/२, केदारीनगर, वानवडी, पुणे-४०.